# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** शाहदा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0248 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/02/2026 02:40

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 20/02/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/02/2026
**Time From (वेळेपासून):** 14:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:21 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/02/2026 **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/02/2026 02:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शहादा शहरातील मोहिदा बायपास रो

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विकास शिवाजी लोंढे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7588029368

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अभिजीत गोवर्धन भावसार | | | 1. प्लाट नं 14 ब आदर्श नगर, शहादा,शाहदा,नंदुरबार,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे रुपये दराच्या चाळीस चलणी नोटा व पाचशे रुपये | 20,000.00 |

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| | | | दराच्या एकुण चारशे साठ डमी नोटा | |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी. विकास शिवाजी लोंढे, वय ३५ वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार. मो.नं. 7588029368.
सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे मागील 05 महीन्यापासुन पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक 20/02/2026 रोजी तक्रारदार गंगाधर विष्णू बुधवंत, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, शहादा जि. नंदुरबार, यांनी पो.ना. हेमंतकुमार महाले नेमणुक ला.प्र.वि. नंदुरबार यांना संपर्क करुन एक लोकसेवका विरुध्द तक्रार असल्या बाबत माहिती कळवुन शहादा येथे येवुन कारवाई करण्याबाबत विनंती केली. त्याप्रमाणे आम्ही तालुका कृशी अधिकारी, नंदुरबार यांना पत्र पाठवुन त्यांच्याकडुन पंच उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार गंगाधर विष्णू बुधवंत यांना पंच, सापळा पथकातील अंमलदार पो.ना/67 हेमंतकुमार महाले , पोना/356 सुभाष पावरा, यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव गंगाधर विष्णू बुधवंत, वय 40 वर्षे, व्यवसाय-नोकरी, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, शहादा जि. नंदुरबार, मुळ रा.पांगरी, ता. जिंतुर, जि. परभणी, असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली.

आम्ही तक्रारदार गंगाधर विष्णू बुधवंत यांना त्यांचे तक्रारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की, “ मी, ग्रामपंचायत काथर्दे दिगर ता.शहादा येथे नेमणुकीस असतांना माझ्या विरुध्द श्री. खंडुसिंग भगवानसिंग गिरासे रा. काथर्दे दिगर ता.शहादा यांनी सन 2024-25 या कालावधीत मी भ्रष्टाचार केले बाबत जि.प. नंदुरबार येथे तक्रारी अर्ज केला होता. त्या अर्जाची चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांनी चौकशी समिती नेमली होती. समितीचे अध्यक्ष गटविकास अधिकारी, तळोदा हे होते. सदर अर्ज चौकशीचा अहवाल गटविकास अधिकारी, तळोदा यांनी जिल्हा परिषद नंदुरबार येथे सादर केला होता. परंतु सदर चौकशी समिती यांनी सादर केलेला चौकशीचा अंतिम अहवाल हा मोघम स्वरुपाचा असून अर्जाची पुन्हा चौकशी करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत गटविकास अधिकारी, शहादा यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी आदेशीत केले होते. सदर चौकशीचे अनुशंगाने मी ब-याच वेळा पंचायत समिती शहादा येथे गेलो होतो. नमुद चौकशीचे कामकाज लिपीक अभिजित भावसार हे करीत होते.

काल दिनांक 19/02/2026 रोजी मला लिपीक श्री. भावसार यांनी फोन करुन पंचायत समिती कार्यालयात दिनांक 20/02/2026 रोजी सकाळी भेटण्यासाठी बोलाविले होते. त्यानुसार मी शहादा येथे जावून लिपीक भावसार यांची भेट घेतली असता भेटी दरम्यान त्यांनी मला सांगितले की, “तुमच्या विरुध्द सुरु असलेल्या भ्रष्टाचारा संबंधीचे चौकशी कामी अगोदर तुमचे दप्तर बीडीओ साहेबा समक्ष हजर करा. साहेबांना सांगून तुमच्या दप्तराची तपासणी करुन तुमच्या बाजुने अनुकूल अहवाल देण्याकामी मला 2,50,000/-रुपये दयावे लागतील” असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केलेली आहे.

पंचायत समिती शहादा, जि.नंदुरबार येथील लिपीक भावसार हे माझ्याकडे मागत असलेले 2,50,000/-रुपये हि कोणतीही शासकीय फि नसुन ती लाचच आहे अशी माझी खात्री झाली असुन मला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथील माझे ओळखीचे श्री. हेमंतकुमार महाले यांना संपर्क

केला व दि.20/02/2026 रोजी शहादा येथे तक्रार दिली आहे.”

उपरोक्त प्रमाणे तक्रारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही तक्रारदार गंगाधर बुधवंत व पंच क्र. 1, श्री. मंदार पाटील यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोना/सुभाष पावरा यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन तक्रारदार गंगाधर बुधवंत यांचे शर्टचे आत बनियनला बांधुन तक्रारदार यांचेकडील खाजगी चारचाकी वाहनाने 14.54 वा. पंचायत समिती , शहादा येथे लोकसेवक अभिजीत भावसार यांची भेट घेणे कामी रवाना केले होते.

तक्रारदार गंगाधर बुधवंत व पंच क्र. 1 श्री मंदार पाटील हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोना/सुभाष पावरा यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र. 1 व तक्रारदार यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी ती कथन केली. त्यानंतर आम्ही सापळा पथकासमक्ष तक्रारदार व पंचायत समिती शहादा येथील लिपीक अभिजीत भावसार यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणा मध्ये लोकसेवक श्री. अभिजीत भावसार यांनी तक्रारदार गंगाधर बुधवंत यांना साहेबांचे दिड व प्लस एक असे करुन दे असे म्हणुन तक्रारदार यांचेकडुन 2 लाख 50 हजार रूपयाची स्पष्ट स्वरुपात लाचेची मागणी केली व “मी सोमवारी किंवा कधीतरी तुम्हाला फोन करेल” असे सांगितले व लोकसेवक अभिजीत भावसार यांनी लाचेची रक्कम स्विकारण्यास संमती दर्शवुन लाचमागणी केल्याबाबत खात्री झाली. यावरून लोकसेवक अभिजीत भावसार यांनी तक्रारदार यांच्या विरुध्द सुरु असलेल्या भ्रष्टाचारा संबंधीचे चौकशी कामी अगोदर दप्तर बीडीओ साहेबा समक्ष हजर करुन साहेबांना सांगून तक्रारदार यांच्या दप्तराची तपासणी करुन तक्रारदार यांच्या बाजुने अनुकूल अभिप्राय देण्याकामी लोकसेवक भावसार यांनी तक्रारदार गंगाधर बुधवंत यांचेकडे 2,50,000/- रूपये लाचेची मागणी केल्याबाबत आमची व सापळा पथकाची खात्री झाली होती. तसा लाच मागणीबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार गंगाधर बुधवंत यांना लोकसेवक अभिजीत भावसार यांचे मागणीप्रमाणे 2,50,000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी हजर करण्यास सांगीतले. परंतु तक्रारदार यांनी त्यांचे शेती उत्पन्नातून बचत केलेले 20,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 40 चलनी नोटा हजर केल्या. यानंतर आम्ही लहान मुलांच्या खेळण्याच्या व हुबेहुब खÚया चलनासारख्या दिसणाÚया 500/-रु दराच्या एकुण 460 डमी नोटा खÚया चलनी नोटांमध्ये टाकुन पंचासमक्ष एकत्र केल्या. अशा एकुण 500 नोटांचे एक बंडल करुन त्यास रबर लावण्यात आले. आमचे सुचनेप्रमाणे पंच क्र. 2, नरेंद्र देसले यांनी सदर नोटांचे नंबर एका कोÚया कागदावर लिहुन घेतले. त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पोना/ सुभाष पावरा यांनी सदर लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदर नोटा व एका पांढरे रंगाच्या पिशवीत ठेवुन सदर पिशवी तक्रारदार यांचे चार चाकी वाहनाचे डॅश बोर्डच्या कप्यात व्यवस्थित ठेवुन दिल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार गंगाधर बुधवंत व पंच क्र. 1 श्री. मंदार पाटील यांचेसह लाचेची रक्कम घेवुन शहादा शहरातील मोहिदा बायपास रोडवरील हॉटेल स्पाईस अॅण्ड ग्रील हॉटेल जवळुन पंचायत समिती शहादा कार्यालय येथे लोकसेवक अभिजीत भावसार यांची भेट घेणे कामी पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तक्रारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोना/हेमंतकुमार महाले यांनी आमचे सुचनेवरून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तक्रारदार गंगाधर बुधवंत यांचे शर्टाचे आत बनियनला लावुन देवुन त्यांना पंच नं 1 यांच्या सोबत तक्रारदार यांचे चारचाकी वाहनाने 15.55 वाजता रवाना केले व आम्ही सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनाचे मागोमाग रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार गंगाधर बुधवंत व पंच क्र. 1 मंदार पाटील असे पंचायत समिती, शहादा कार्यालयाजवळ पोहचलो. त्यानंतर आम्ही नमुद कार्यालयाच्या आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार हे त्यांच्या चारचाकी वाहनाने व लोकसेवक अभिजीत भावसार हे त्यांचे कडील मॅस्ट्रो स्कुटरने पंचायत समिती कार्यालयातुन मागोमाग बाहेर पडल्याने आम्ही त्यांचे मागे खाजगी वाहाने पंचासह गेलो असता रस्त्यात बचपन शाळेजवळ वाहन थांबले. सदर वाहनात लोकसेवक अभिजीत भावसार बसले व सदर वाहन पुढे शहादा शहरातील मोहिदा बायपास रोडवरील हॉटेल स्पाईस अॅण्ड ग्रील हॉटेल जवळ थांबले त्यानंतर ते दोघे हॉटेल मध्ये गेले तेव्हा पंच नं 1 मंदार पाटील यांना त्यांचे मागोमाग पाठविले व थोडया वेळाने तक्रारदार बुधवंत लोकसेवक भावसार व पंच नं 1 असे हॉटेल बाहेर आले तेथे तक्रारदार यांनी लाचेची रक्कम लोकसेवक भावसार यांचे हातात दिल्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत 17.21 वा. सापळा पथकास इशारा केला. तेव्हा सदर ठिकाणी आम्ही व सापळा पथकाने लोकसेवक अभिजीत भावसार यांना ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पोना/ हेमंतकुमार महाले यांनी तक्रारदार यांचेकडे असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या लोकसेवक अभिजीत भावसार यांस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता

विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नांव अभिजीत गोवर्धन भावसार वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ सहाय्यक , मंत्रा नेमणुक - पंचायत समिती, शहादा , जि. नंदुरबार रा. प्लाट नं 14 ब, आदर्श नगर शहादा, जि. नंदुरबार असे सांगितले.

तरी दिनांक 20/02/2026 रोजी लोकसेवक अभिजीत गोवर्धन भावसार वय 44 वर्षे, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ सहाय्यक , (मंत्रा) नेमणुक - पंचायत समिती, शहादा , जि. नंदुरबार रा. प्लाट नं 14 ब आदर्श नगर शहादा, जि. नंदुरबार यांनी तक्रारदार श्री. गंगाधर विष्णू बुधवंत यांचेविरुध्द भ्रष्टाचार केले बाबतच्या चौकशीचा अहवालावर गटविकास अधिकारी, शहादा यांना सांगुन तक्रारदार यांचे दप्तराची तपासणी करुन त्यांच्या बाजुने अभिप्राय देण्याच्या मोबदल्यात 2,50,000/- रुपये लाचेची मागणी करुन आज दिनांक 23/02/2026 रोजी सायकाळी 17.21 वाजेच्या सुमारास पंच क्र. 1 यांचेसमक्ष शहादा शहरातील मोहिदा बायपास रोडवरील हॅाटेल स्पाईस अॅण्ड ग्रील हॅाटेलच्या बाजुला मागणी केलेली लाचेची रक्कम 2,50,000/- रुपये स्विकारली, म्हणुन माझी त्यांचेविरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 चे कलम 7, 7अ प्रमाणे फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष, हि फिर्याद दिली.
दि.23/02/2026.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

HEMANTKUMAR PRABHAKAR PATIL(I (Inspector)) / PNMAH47488 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली**.)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** HEMANTKUMAR PRA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PNMAH47488

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**